नियमीत फौजदारी खटला क्रं. ६५४/२००९
निशाणी नं. ८१

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.७ चा सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. के. नवगिरे यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

नाव : राजेश अर्जुन खटनानी,
वय ५७ वर्षे, धंदा : काही नाही,
राहणार : कॅम्प, गितांजली कुंज, पुणे.

१. मी न्यायालयात हजर असलेल्या आरोपींना ओळखतो. मी आरोपी रिकी शहा यांना बघितलेले नाही. आरोपींचा मॅन्ड्रीड मोबाईल सिस्टीम नावाची कंपनी होती. त्या कंपनीमध्ये पैसे गुंतवले तर ते परतावा देत होते. मी त्यांच्या स्कीममध्ये १० आयडी तयार केले होते. प्रत्येक आयडीचे ५ हजार रुपये असे ५० हजार रुपये गुंतवले होते. सदरची गुंतवणुक मी २००९ मध्ये केली होती. मला त्या रक्कमेपासनु कोणताही परतावा आरोपीने दिले नाही. त्यांनतर मला कळाले की, आरोपीची कंपनी बंद झाली आहे. त्यानंतर काही दिवसांनी मला मॅसेज आला की, प्रत्येक आयडीसाठी ५०० रुपये जमा केल्यास पैसे मिळू शकतात परंतु सुरुवातीची मला कोणतीही रक्कम मिळाली नसल्याने मी ५०० रुपये जमा केले नाही. पोलिसांनी माझी विचारपुस केली नाही.

**आरोपींनी दिलेला अर्ज निशाणी क्रं. ..... वरील आदेशाने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
(एस. एच. अटकारे )
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक : २२/०३/२०२४.

नियमीत फौजदारी खटला क्रं. ६५४/२००९
निशाणी नं. ८१

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. सि. जे. जोव्हसन यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

२. आरोपींची मॅन्ड्रीड मोबाईल सिस्टीम नावाची कंपनी होती, यासंदर्भात मी दस्तऐवज पाहिलेला नाही. आरोपी हे माझे मित्र होते त्यांनी त्या नावाची कंपनीची मला माहिती झाली होती. मी प्रिती ओसवाल यांना ओळखतो. प्रिती ओसवाल हिने मला माझी सुध्दा मॅन्ड्रेड नावाची कंपनी आहे त्यामध्ये तुम्ही गुंतवणुक करु शकतात, असे सांगितले होते. मी दहा आयडी बनवले त्या पावत्यांवर कोणाच्या सह्या होत्या, हे मी सांगु शकत नाही. दहा आयडीवर मला काहीही परतावा मिळाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मॅन्ड्रीड कंपनीसाठी एजंट म्हणून काम करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मेंबर झाल्यानंतर त्या कंपनीचे आयडी क्रीएट झाल्यानंतर जर आयडी धारकांनी पुढील दुसरा मेंबर जॉईन केल्यानंतर कमिशन मिळणा होते, मी कोणालाही मेंबर म्हणून प्रपोज केले नाही. आयडीसाठी मी रोख रक्कम दिली होती. कंपनीने रक्कमेच्या पावत्या दिल्या होत्या.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी कंपनीकडुन तीन हजार रुपयांचा चेक मिळाला. आरोपींनी मॅन्ड्रीड कंपनीच्या विरुध्द मुंबई व पुणे येथे तक्रार दाखल केली होती किंवा काय, याची मला माहिती नाही. बॉबे विल्यम्स व प्रिति ओसवाल यांनी संगणमत करुन सदरची तक्रार दाखल केली किंवा काय मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी या प्रकरणातील खरे तथ्य न जाणता खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे सर्व निरपराध आहेत.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

माझ्या समक्ष ,

सही/–
(एस. एच. अटकारे )
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.
दिनांक : २८/०५/२०२४.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
(एस. एच. अटकारे )
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.